**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १६७ वा | मंगळवार, दि.०३ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कोठेंचा मास्टरस्ट्रोक; दोन्ही देशमुखांना चेकमेट करत मारली बाजी

## महापौरपदासाठी विनायक कोंड्याल, उपमहापौरपदासाठी ज्ञानेश्वरी देवकर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या निवडीत आमदार देवेंद्र कोठे यांनी राजकीय डावपेचात दोन्ही देशमुख गटांना चेकमेट देत बाजी मारली असून, भाजपकडून त्यांच्या भाऊजी विनायक कोंड्याल यांना महापौरपदाची उमेदवारी देण्यात आली आहे. तर उपमहापौरपदासाठी ज्ञानेश्वरी महेश देवकर यांना संधी देण्यात आली आहे. दोघांनीही आज उमेदवारी अर्ज दाखल केले असून, भाजपकडे स्पष्ट बहुमत असल्याने त्यांची निवड केवळ औपचारिकता



ठरणार आहे. सोलापूर महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक कामगिरी करत १०२ पैकी तब्बल ८७ जागा जिंकल्या आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली आमदार विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख आणि देवेंद्र कोठे यांनी पक्षाला मोठे यश मिळवून दिले. हे भाजपचे सोलापुरातील आतापर्यंतचे सर्वात मोठे यश मानले जात आहे.

**महापौरपदासाठी जोरदार रस्सीखेच**

महापौरपद हे 'खुले' प्रवर्गात असल्याने इच्छुकांची संख्या मोठी होती. आमदार कोठे यांचे भाऊजी विनायक कोंड्याल, आमदार विजयकुमार देशमुख यांचे पुत्र किरण देशमुख, भाजपचे वरिष्ठ नगरसेवक नरेंद्र काळे आणि अनंत जाधव ही प्रमुख नावे चर्चेत होती.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून आलेले नरेंद्र काळे यांना महापौरपदाची संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, त्यांची गटनेतेपदी निवड करून महापौरपदाच्या शर्यतीतून एक प्रभावी उमेदवार बाजूला करण्यात आला. त्यानंतर पक्षाने अखेर विनायक कोंड्याल यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

**संख्याबळ असूनही देशमुख गट मागे**

महापालिकेतील भाजपच्या ८७ नगरसेवकांपैकी आमदार देवेंद्र कोठे आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या गटातील ४१ नगरसेवक निवडून आले आहेत. आमदार विजयकुमार देशमुख गटाचे २५, तर सुभाष देशमुख समर्थकांचे १७ नगरसेवक आहेत.

संख्याबळाच्या दृष्टीने दोन्ही देशमुख गटांची एकत्रित ताकद कोठे समर्थकांपेक्षा अधिक असतानाही, अंतिम निर्णयात कोठे यांनी बाजी मारल्याचे स्पष्ट झाले आहे. यामागे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे पाठबळ निर्णायक ठरल्याचे बोलले जात आहे.

**थेट मुख्यमंत्र्यांशी संपर्क ठरला निर्णायक?**

राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, आमदार देवेंद्र कोठे यांचा थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क आणि वरिष्ठ पातळीवरची पकड यामुळेच महापौरपदाची संधी त्यांच्या गटाकडे आली. त्यामुळे पहिल्याच टर्ममध्ये दोन्ही देशमुखांना राजकीयदृष्ट्या चेकमेट देण्यात कोठे यांना यश आले आहे.

**औपचारिक निवड आज**

विनायक कोंड्याल आणि ज्ञानेश्वरी देवकर यांच्या उमेदवारी अर्जावर आज मतदान होणार असून, भाजपकडे स्पष्ट बहुमत असल्याने त्यांची निवड निश्चित मानली जात आहे. सोलापूर महापालिकेच्या सत्ताकेंद्रात आता कोठे गटाचे वर्चस्व अधिक ठळक होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. महापौरपदाच्या या निवडीतून सोलापूरच्या राजकारणात नवे समीकरण तयार झाले असून, आगामी काळात भाजपअंतर्गत राजकारणातही याचे पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# 'दादा पुन्हा या..' अस्थी कलशासमोर ओघळले अश्रू, सोलापूरकरांचा फुटला टाहो

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि भावनिक जीवनावर खोल जखम उमटली आहे. 'सामान्यांचा नेता, संघषार्तून उभा राहिलेला मार्गदर्शक आणि जनतेचा खरा आधारवड' म्हणून ओळखले जाणारे अजितदादा आता कायमचे काळाच्या पडद्याआड गेले आहेत. त्यांच्या जाण्याने सोलापूर शहरासह संपूर्ण जिल्हा शोकसागरात बुडाल्याचे चित्र मंगळवारी पाहायला मिळाले.



कोल्हापूर येथून दुपारी चार वाजता स्व. अजितदादांचा पवित्र अस्थी कलश सोलापूरमध्ये दाखल झाला. सोलापूरकरांना अखेरचे दर्शन घेता यावे यासाठी हा अस्थी कलश राष्ट्रवादी काँग्रेस भवन, जुनी मिल कंपाऊंड येथे ठेवण्यात आला होता. अस्थी कलश परिसरात दाखल होताच वातावरण गंभीर, शांत आणि भावनांनी भारलेले झाले. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तर अनेकांच्या ओठांवर शब्दच नव्हते.

अस्थी कलशाचे दर्शन घेताना राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच शेकडो सामान्य नागरिक भावनाविवश झाले. 'अजितदादा अमर रहें', 'नेता नाही तर कुटुंबप्रमुख गेला', 'दादा आम्हाला सोडून जाऊ नका' अशा आर्त घोषणा देत अनेक कार्यकर्त्यांचा टाहो फुटला. काही कार्यकर्ते अस्थी कलशासमोर नतमस्तक होऊन दीर्घकाळ शांत उभे राहिले, तर काहींच्या डोळ्यांतून अश्रूंचा अखंड प्रवाह वाहत होता.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस खलील शेख यांनी हा पवित्र अस्थी कलश सोलापूरमध्ये आणला. त्यांच्या उपस्थितीत संपूर्ण विधी अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तीभावाने पार पडला. यावेळी गवळी वस्ती महिला भजनी मंडळाच्या वतीने भजन सेवा सादर करण्यात आली. विठ्ठलनामाचा गजर, अभंग आणि भजनांच्या सुरांनी परिसर अधिकच भारावून गेला. अनेक महिलांनी डोळ्यांत अश्रू साठवत भजनात सहभाग घेतला.

या शोकाकुल प्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, माजी शहराध्यक्ष भारत जाधव, धर्मराज काडादी, माजी उप महापौर आप्पाशा म्हैत्रे

आनंद चंदनशिवे, ज्येष्ठ पत्रकार हेमंत चौधरी, गणेश पुजारी, हाजी मकबूल शेख, विनोद भोसले, आनंद मुस्तारे, महादेव चाकोते, प्रा. श्रीनिवास कोंडी, सुहास कदम, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, ॲड. सलीम नदाफ, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, अनिल उकरडे, वैभव गंगणे, चंद्रकांत पवार, इरफान शेख, मनोज शेरला, प्रशांत जाधव, महबूब पटेल, भास्कर आडकी, मौला शेख, बसवराज कोळी, महिपती पवार, दशरथ शेंडगे, मकरंद शिवशक्ती, अबोली मंजेली, आयुब शेख, स्वप्निल जाधव, शिवराज तलाठी, दत्तात्रय बनसोडे, निशांत तारानाईक, प्रदीप बालशंकर, श्रीकांत वाघमारे, रुपेश भोसले, सूर्यकांत मसळी, सचिन चलवादी, सागर गायकवाड, श्री जाधव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी स्व. अजितदादांच्या स्मृतींना उजाळा देत उपस्थितांनी मौन पाळले. 'दादा आमच्या हृदयात कायम जिवंत राहतील' अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी आणि जड अंतःकरणाने सर्वांनी स्व. अजितदादांना अखेरचे अभिवादन केले.

त्यानंतर अत्यंत शोकमय वातावरणात हा पवित्र अस्थी कलश पुढील धार्मिक विधीसाठी मोहोळझ्र कुरुल येथे रवाना करण्यात आला. अस्थी कलश निघताना पुन्हा एकदा कार्यकर्त्यांचा टाहो, घोषणा आणि अश्रूंचा पूर पाहायला मिळाला.

आज सोलापूरने केवळ एक नेता नाही, तर आपला माणूस, मार्गदर्शक आणि विश्वासाचा आधार गमावल्याची भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

# 'चोखोबा ते तुकोबा - एक वारी समतेची'चे सोलापुरात भव्य आगमन

## समता सभेतून सामाजिक सलोख्याचा जागर, समाजप्रबोधन पुरस्कारांचे वितरण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'चोखोबा ते तुकोबा झ्र एक वारी समतेची' या राज्यव्यापी सामाजिक प्रबोधन उपक्रमाचे आज सायंकाळी हुतात्मा नगरी सोलापूर येथे उत्साहात आगमन झाले. या निमित्ताने शिवस्मारक, सोलापूर येथे समता सभा व ह.भ.प. रखमाजी भालेराव समाजप्रबोधन पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उपस्थितीत संपन्न झाला.



संत चोखामेळा अध्यासन केंद्र, वृंदावन फाउंडेशन व 'चोखोबा ते तुकोबा - एक वारी समतेची' मध्यवर्ती संयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही आठव्या वषार्तील समता वारी असून, रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी संत चोखामेळा महाराजांच्या कर्मभूमी मंगळवेढा येथून या वारीचे प्रस्थान झाले आहे. संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सोहळ्याने या वारीचा शुभारंभ करण्यात आला असून, सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी जगद्गुरु संत तुकोबाराय महाराजांच्या जन्मभूमी देहूगाव येथे या वारीचा समारोप होणार आहे.

ही समता वारी सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अहिल्यानगर व पुणे अशा ९ जिल्ह्यांतून सुमारे १७५० किलोमीटरचा प्रवास करीत आहे. या प्रवासादरम्यान समाजातील वाढती विषमता, जातीयवाद, धार्मिक विद्वेष, नक्षलवाद व दहशतवाद यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर सकारात्मक व वैचारिक प्रबोधन करण्यात येत आहे.

सोलापूर येथील कार्यक्रमास माजी खासदार सुनीलराव गायकवाड, संत साहित्याचे अभ्यासक व समता वारीचे प्रणेते सचिन पाटील, डॉ. लक्ष्मण हेंबाडे, ज्येष्ठ कवी फुलचंद नागटिळक, सविता भालेराव, प्राचार्य सिद्धाराम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना ह.भ.प. रखमाजी भालेराव समाजप्रबोधन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यामध्ये सद्गुरु गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालय, सोनाली निकम (क्रीडा), सिद्रामप्पा पाटील (शिक्षण), रेणुकाताई सुतार (आरोग्यसेवा) व परमेश्वर चव्हाण (बालक सेवा व समाजसेवा) यांचा समावेश होता.

**सुनीलराव गायकवाड :-** 'आज समाजात वाढत चाललेली दरी ही केवळ आर्थिक नाही, तर ती वैचारिक आहे. अशा काळात संत चोखामेळा आणि संत तुकोबाराय यांनी दिलेला समतेचा विचार समाजाला एकत्र आणणारा आहे. 'चोखोबा ते तुकोबा - एक वारी समतेची' हा उपक्रम म्हणजे समाजाला विवेकाची दिशा देणारी चळवळ आहे. या वारीमधून निर्माण होणारी सामाजिक जाणीव हीच खरी राष्ट्रसेवा आहे,झ्र असे प्रतिपादन माजी खासदार सुनीलराव गायकवाड यांनी केले.

**सचिन पाटील :-** 'ही वारी म्हणजे केवळ पायी चालणारा प्रवास नाही, तर विचारांची, माणुसकीची आणि समतेची यात्रा आहे. संत चोखामेळा व संत तुकोबाराय यांच्या विचारांवर आधारित हा वारीमार्ग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, हा आमचा ध्यास आहे. जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन ह्यआपण सर्व भारतीय आहोत' हा विचार समाजमनात रुजवणे, हेच या समता वारीचे अंतिम उद्दिष्ट आहे,झ्र असे समता वारीचे प्रणेते सचिन पाटील यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे निवेदन प्रो. निलोफर बागवान व प्रो. अशोक कदम यांनी केले.

यावेळी दत्ता वाघमारे, अविनाश अभंगराव, महादेव ढेंबरे, ॲड. रोहित मुंडे, आशिष यादव, तानाजी चिलवंत यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समता, बंधुता, स्वातंत्र्य व मानवता या वारकरी संतांनी दिलेल्या मूल्यांचा जागर करणारी ही वारी समाजात संवाद, सलोखा आणि समतेची नवी दृष्टी निर्माण करीत असल्याचे चित्र सोलापूर येथील समता सभेतून स्पष्टपणे दिसून आले.

# भाजपाच्या पाठीशी राहून विकास कामासाठी संधी द्या : अक्षय खताळ

## कामती भागात प्रचार रॅली



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** नरेंद्र मोदींच्या शक्तिशाली नेतृत्वाखाली व देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या अभ्यासू व्यक्तिमत्वामुळे महाराष्ट्राचा न भूतो न भविष्यती असा सुजलाम विकास झाला आहे. राज्यामध्ये रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य अशा सर्वच सोयी सुविधा होत असताना महाराष्ट्र एका वेगळ्या उंचीवर पोहचला आहे. विद्यार्थी, लाडक्या बहिणी, शेतकरी यांना थेट योजना पोहचविण्यासाठी सरकार अथक प्रयत्न करत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्राचा अजून भरीव विकास करायचा असेल तर भारतीय जनता पार्टीच्या आणि जि.प. उमेदवार विमलताई खताळ, पं.स. उमेदवार कोमल आवताडे यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे रहा असे आवाहन युवा नेते अक्षय खताळ यांनी केले आहे.

कामती व परिसरातील गावामध्ये प्रचार रॅली आयोजित केली होती. यावेळी मतदारांशी संवाद साधत असताना ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले कि, कामती भागात माझे वडील स्व. तानाजीआण्णा खताळ यांनी प्रतिनिधित्व केले आहे. यावेळी त्यांच्याकडून मतदारसंघात वेगवेगळी विकासकामे झाली आहेत. मात्र त्यांच्या स्वप्नातील मतदारसंघ घडवायचा आहे. आणि त्यासाठी घराघरातील महिला, खांद्याला खांदा लावून झटणारे युवक, वयोवृद्ध आपल्या सर्वांची साथ आणि आशीर्वाद पाहिजे असे भावनिक आवाहन त्यांनी शेवटी केले.

**मतदारांचा प्रचंड प्रतिसाद आहे**



- कामती मतदार संघात गेल्या महिनाभरापासून प्रचाराच्या निमित्ताने गावाकऱ्यांच्या गाठीभेटी घेत असताना त्यांचे आशीर्वाद स्वीकारत असताना जनतेने खुप आदराने स्वागत केले आहे. कारण स्व. तानाजी आण्णा यांची नाळ इथल्या मातीशी, इथल्या प्रत्येक नागरिकांशी जोडली आहे. त्यामुळे कामती गटात चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**-विमलताई तानाजीराजे खताळ**
जि.प. उमेदवार कामती गट

# मानेगाव गटात भाजपचा विजय निश्चित- पृथ्वीराज सावंत

## माजी आमदार अँड धनाजीराव साठे व गटाचा भाजपच्या उमेदवारांना पाठिंबा



**माढा (कटूसत्य वृत्त):-** मानेगाव जिल्हा परिषद गटात भाजपच्या उमेदवारांना माढ्यातील माजी आमदार अँड. धनाजीराव साठे व त्यांच्या गटाने जाहीर पाठिंबा दिल्याने विजयाचा मार्ग अधिक सुकर झाला असून, गेल्यावेळी परस्परविरोधात असलेले सर्व नेते आज विकासाच्या मुद्यावर एकत्र आले आहेत. असे प्रतिपादन भाजप नेते पृथ्वीराज सावंत यांनी केले.

साठे गटाच्या पाठिंब्यामुळे मानेगाव गटातील जनतेचा विश्वास भाजपवर अधिक दृढ झाला असून, ही निवडणूक विकास विरुद्ध विरोधकांची राजकीय दिशाहीनता अशी ठरणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मानेगाव जिल्हा परिषद गटात भाजपच्या उमेदवारांना माजी आमदार अँड. धनाजीराव साठे यांच्या गटाने जाहीर पाठिंबा दिल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत.

गेल्या निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात लढलेले दादासाहेब साठे, पृथ्वीराज सावंत आणि रणजितसिंह शिंदे हे नेते आता एकत्र आले असून, या एकजुटीमुळे भाजपची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. साठे गटाची मानेगाव गटात निर्णायक ताकद मानली जाते.

या निवडणुकीत दादासाहेब साठे हे मोठ्या भावाची भूमिका बजावत प्रचाराची धुरा सांभाळणार असल्याचे पृथ्वीराज सावंत यांनी सांगितले. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यकर्त्यांच्या मजबूत संघटनेचा लाभ भाजपच्या उमेदवारांना होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे नेते दादासाहेब साठे यांनी भाजपच्या सर्व उमेदवारांना पाठिंबा जाहीर केल्याने मानेगाव गटातील राजकारणाला नवे वळण मिळाले आहे. विकास, स्थैर्य आणि समन्वयाच्या राजकारणासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी आमदार अँड. धनाजीराव साठे, दादासाहेब साठे, नगराध्यक्षा अँड. मीनल साठे, ऋतुराज सावंत, कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ तसेच भाजप व साठे गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ७ फेब्रुवारीला निवडणुकांसाठी मिळणार भरपगारी सुट्टी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील नोकरदारवगार्साठी महत्वाची बातमी आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकांसाठी येत्या ७ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी राज्य सरकारने भरपगारी सुट्टी जाहीर केली आहे. जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये राज्यातील तसेच राज्याच्या सीमेलगतच्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी ७ फेब्रुवारीला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

उद्योग, आस्थापना आणि कारखान्यांमधील कामगार आणि कर्मचाऱ्यांना ७ फेब्रुवारी या दिवशी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी मतदान करण्यासाठी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, उर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाने जारी केले आहे. निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात आली आहे.

७ फेब्रुवारीला सुट्टी उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यामध्ये खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने आणि इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स या सर्वांना सरकारचे हे आदेश लागू राहणार आहेत. याठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना सुट्टी द्यावी लागेल किंवा त्यांना सवत द्यावी लागेल.

महत्वाचे म्हणजे, अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात अधिकारी, कर्मचारी आणि कामगार यांना जर पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापन मालकांनी घेणे आवश्यक राहिल असे या परिपत्रकात सांगण्यात आले आहे.


VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार - SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार - SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL | HATCHBACK RS. 2500/- | SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG - RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## संपादकीय

### पायाभूत सुविधांना मेगाबूस्टर

चांगल्या वाहतूक सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे लॉजिस्टिक्स कॉस्ट कमी होतो. पायाभूत सुविधांवरील खर्चाचा वाढता आलेख हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ठरतो. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवर आधारित विकासाला गती देण्यासाठी भांडवली खर्चात (कॅपिटल एक्स्पेंडिचर) मोठी वाढ करण्याची घोषणा केली आहे. आर्थिक वर्ष 2026-27 साठी सरकारने 12.2 लाख कोटी रुपयांचा भांडवली खर्च प्रस्तावित केला असून, चालू आर्थिक वर्षातील 11.2 लाख कोटी रुपयांच्या तुलनेत ही लक्षणीय वाढ आहे. गेल्या दशकात सार्वजनिक गुंतवणुकीत झालेली ही वाढ थक्क करणारी असून, 2014-15 मधील 2 लाख कोटी रुपयांवरून हा प्रवास आता 11.2 लाख कोटी रुपयांच्या पार गेला आहे. यावेळच्या अर्थसंकल्पीय भाषणात शहरांच्या माध्यमातून आर्थिक विकासाला गती देण्यासाठी सरकारने 'सीटी इकॉनॉमिक रिजन' ही संकल्पना मांडली आहे. 5 लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने 'टियर-2' आणि 'टियर-3' शहरांचा समावेश असून, ही शहरे आता देशाची महत्त्वाची आर्थिक विकास केंद्रे म्हणून उदयास येत आहेत. या शहरांमध्ये पायाभूत सुविधांचे जाळे विणल्यामुळे केवळ नागरी जीवन सुस' होणार नाही, तर रोजगाराच्या मोठ्या संधीही निर्माण होतील. सरकारने या खर्चाद्वारे खासगी गुंतवणुकीला आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, जेणेकरून अर्थव्यवस्थेची मागणी अधिक मजबूत होईल. देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग पाहिला तर चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर 7.4 टक्के राहण्याचा अंदाज आहे, तर महागाईचा दर 2 टक्क्यांच्या जवळ राहण्याची शक्यता आहे. सरकारने वित्तीय शिस्त पाळण्याचेही संकेत दिले असून, वित्तीय तूट जीडीपीच्या 4.4 टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. भांडवली खर्चाचा 'मल्टिप्लायर इफेक्ट' अधिक असतो. कारण रस्ते, रेल्वे, गृहनिर्माण आणि लॉजिस्टिक क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे उत्पादन आणि सेवा क्षेत्रालाही मोठी चालना मिळते. सात नव्या रेल्वे कॉरिडॉरची घोषणा ही यामधील महत्त्वाची तरतूद म्हणावी लागेल. भारताची आर्थिक गती दुसऱ्या तिमाहीत 8.2 टक्क्यांपर्यंत पोहोचली असून, ही गेल्या सहा तिमाहीतील सर्वोच्च पातळी आहे. मागील दोन वर्षांतील 6.5 टक्के आणि 9.2 टक्के या वृद्धी दरांच्या तुलनेत ही कामगिरी आशादायक आहे. भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्यासाठी पायाभूत सुविधांवरील हा खर्च अत्यंत कळीचा ठरणार आहे. जेव्हा खासगी क्षेत्रातील गुंतवणूक अपेक्षेप्रमाणे वेग घेत नाही, तेव्हा सरकारी खर्च हा अर्थव्यवस्थेसाठी मागणीचा मुख्य आधार ठरतो, हेच या निर्णयामागचे प्रमुख कारण आहे. गेल्या काही वर्षांतील आकडेवारी पाहिल्यास सरकारचा हा कल सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते. गेल्या दशकात सुरुवातीला म्हणजेच 2016-17 मध्ये भारताचा भांडवली खर्च साधारणपणे 2.8 लाख कोटी रुपये इतका होता. पुढील काही वर्षांत यात संथ पण सातत्यपूर्ण वाढ दिसून आली. 2019-20 पर्यंत हा आकडा 3.4 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला होता. मात्र कोविड-19 नंतरच्या काळात आर्थिक चक्राला गती देण्यासाठी केंद्र सरकारने भांडवली खर्चावर विशेष भर देण्याचे धोरण स्वीकारले.


2020-21 मध्ये हा खर्च 4.1 लाख कोटी रुपयांवर गेला आणि त्यानंतरच्या वर्षांत यात मोठी झेप पाहायला मिळाली. 2021-22 मध्ये भांडवली खर्च 5.9 लाख कोटी रुपये झाला जो 2022-23 मध्ये 7.4 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला. 2023-24 च्या अर्थसंकल्पात सरकारने मोठी वाढ करत हा आकडा 10 लाख कोटी रुपयांच्या पार नेला. आर्थिक वर्ष 2025-26 च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च 11.21 लाख कोटी रुपये ठेवण्यात आला होता, जो 2024-25 च्या सुधारित अंदाजापेक्षा म्हणजेच 10.18 लाख कोटी रुपयेपेक्षा जास्त होता. आता यात पुन्हा वाढ करण्यात आली आहे. जागतिक स्तरावर विचार केला तर भारत हा सार्वजनिक गुंतवणुकीवर सर्वाधिक खर्च करणाऱ्या आघाडीच्या देशांपैकी एक बनला आहे. केवळ अर्थसंकल्पीय तरतूदच नाही, तर सार्वजनिक होणाऱ्या खर्चाचा वेगही वाढला आहे. ताज्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष 2025-26 च्या पहिल्या नऊ महिन्यांत (एप्रिल ते डिसेंबर) सरकारने वार्षिक तरतुदीच्या 70.3 टक्के निधी खर्च केला आहे. मागील वर्षी याच कालावधीत हा वापर केवळ 61.7 टक्के होता. खर्च करण्याच्या या वाढलेल्या वेगामुळे महामार्ग, रेल्वे, लॉजिस्टिक्स आणि शहरी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना मोठी गती मिळत आहे. सरकारच्या या धोरणामुळे नवीन मालमत्ता निर्माण होण्याबरोबरच खासगी कंपन्या आणि पुरवठादारांना नवीन ऑर्डर्स मिळून गुंतवणुकीचे चक्र गतिमान होत आहे. बांधकाम क्षेत्र, सिमेंट, लोखंड आणि इतर संबंधित उद्योगांमध्ये मजुरांपासून इंजिनिअर्सपर्यंत सर्वांना काम मिळते. हे उत्पन्न पुन्हा बाजारात येते आणि मागणी वाढवण्यास मदत करते.या प्रचंड निधीचा विनियोग प्रामुख्याने रस्ते आणि महामार्ग विकास तसेच रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी करण्यात आला आहे. संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी बनावटीच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी देखील मोठा भांडवली खर्च केला जात आहे. याव्यतिरिक्त जलशक्ती विभाग आणि शहरी विकास प्रकल्पांनाही यातून मोठे पाठबळ मिळाले आहे.

राज्यांना भांडवली खर्च करण्यासाठी केंद्र सरकारकडून 50 वर्षांचे व्याजमुक्त कर्ज देखील दिले जात आहे. भांडवली खर्चातील ही वाढ केवळ रोजगाराची निर्मिती आणि खासगी गुंतवणुकीला मिळणारे प्रोत्साहन यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक स्तरावर वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात आहे. रिझर्व्ह बँकेच्या अंदाजानुसार, भांडवली खर्चात केलेल्या 1 रुपयाच्या गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेत जवळपास 2.45 ते 3.25 रुपयांची वाढ होऊ शकते. यामुळे देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाला (जीडीपी) मोठी चालना मिळते. चांगल्या वाहतूक सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे मालवाहतुकीचा खर्च (लॉजिस्टिक्स कॉस्ट) कमी होतो. वीज आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीमधील सुधारणांमुळे उद्योगांची कार्यक्षमता वाढते. यामुळे भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक ठरतात. या दृष्टीने विचार करता पायाभूत सुविधांवरील खर्चाचा वाढता आलेख हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ठरणार आहे.

# सत्तेसाठी चाललेला थैमान..., लोकशाहीची क्रूरथट्टा !

सत्तेतून पैसा, व पैशातून सत्ता. हेच समीकरणे निवडणुकीचे काळात दिसत आहे. फुले- शाहू- आंबेडकरने भारतीय राज्यघटनेच्या व्यवस्थेला प्राधान्य दिले होते. परंतु घटनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार हा पूर्णत्वात जाऊ नये, या विचाराने पछाडलेल्या कॉंग्रेसने डॉ. आंबेडकरांचा राजकीय दृष्ट्या पराभव केला, तसेच राज्य घटनेत मुळसंविधानाचा तालमेळ बिघडविलामुळे, कृषीप्रधान देशात शेतकरी आत्महत्या होणे ही या पराभवाचीच लक्षणे आहेत. आजची राज्य घटना जुन्या कॉंग्रेसमय विचारसरणीचे संविधान आहे. आणि त्यातही गरजेनुसार, काही चुकीचे धोरणे राबवून सत्ता चालवल्या गेलेली सरकारे आहेत. मूळ संविधान हे 18 जून 1951 ला पहिली घटना दुरुस्ती करून बदलविण्यात आले व त्यानुसारच आतापर्यंत बीजेपी ने राजवट चालवली. (म्हणजेच या मूळ संविधानाचे घटना दुरुस्तीत उदा. समुद्रातील मंथना प्रमाणे जसे दुधातील ताक व तूप हे वेगळे होते.) तसेच घटनेतील मुळगाभा म्हणजेच दुधातील तूपच संपवण्याचा घाट ,या कॉंग्रेस व भाजप दोन्ही राजकीय पक्षांनी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवरच सामान्य लोकांची परिस्थिती गरीबी , दुरुस्ती झाली . आज २६ जानेवारी १९५० रोजीचे प्रजासत्ताक दिनी समर्पित केलेल्या डॉ. आंबेडकरांच्या मूळ संविधानाला जर खरे स्वरूप दिले आजही दिले गेले असते तर एवढा कलह माजला नसता, अनर्थ घडला नसता. संविधानाचे तुकडे करून देश चालविला गेला. उदा.- दुधाचे मंथन करून तूप, दही व तूप वेगळे केले जाते, आणि मंथन करून निघालेल्या नुसतं ताकावरच्या व्यवस्थेवर (संविधाना तील छोट्याश्या तुकड्यावर) जर या देशाची एवढी प्रगती झाल्याची दिसत आहे.तर संविधानातील महत्वाचे टप्पे (दुधातील तूप) नष्ट करूनच शेतकरी-शेतमजूर मारला गेला, व देशाची अपरिमित हानी करण्यात आली . जर राज्यघटना मूळ संविधाना प्रमाणे ( उदा. जर दूध एकत्र असल्याप्रमाणे संविधान) चालले




असते तर आज भारत देशाची प्रगती दैदिप्यमान, व बलशाली राहिली असती. भारत देश एव्हढा कर्जबाजारी झाला नसता. दिवसें दिवस फुले - शाहू - आंबेडकर विचार हा दाबल्या जात असून लोकशाही संपुष्टात आणण्याचे प्रकार चालू झाले. हिंदू राष्ट्र निर्मितीवर भर देऊन सामाजिक जीवनातील व्यवस्था, धार्मिक तेढ वाढवून ती बदलण्याचा प्रकार भारत देशात सुरू झाला. त्यामुळे सामाजिक विषमता येवून नैतिकतेची मूल्य पायदळी तुडविल्या जात आहे. आणि हे मूल्य पायदळी तुडविण्याची सुरुवात कॉंग्रेसने केली आणि तीच बीजेपी सरकारने आजपर्यंत खतपाणी घालून अजून राबविली. त्यामुळे कॉंग्रेस व बीजेपी हे एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्ही राजकीय पक्ष ही लोकशाहीची क्रूर थट्टा करून,ती संपवण्यासाठी जबाबदार आहेत. म्हणूनच -

"कॉंग्रेस - बीजेपी हटाव,
भारत देश बचाव, भारत
देश का किसान बचाव '
भारत देश की लोकशाही
बचाओ, और लोकतंत्र बचाओ''

राजकीय पक्षाच्या वाटचाली धोरणात्मक न वाटता, सत्तापिपासू असल्याचे दिसत आहेत. आर. एस. एस. व भाजपला संपूर्ण देश बदलण्यात यश आले तरी, कॉंग्रेसचे कारकिर्दीत ज्या मागील पन्नास वर्षात राजकीय,व सामाजिक चुका झाल्या आहेत , त्या दुरुस्त करून पुन्हा नवीन प्रक्रियेने सत्तेची वाटचाल होईल असे समाज मनाला नक्कीच वाटत होते. त्यासाठी त्यांनी अनेकवेळा सरकारे बदलविली, परंतु कोणत्याही सरकारने मूळचूक दुरुस्त केली नाही. भाजपा सरकारची वाटचाल देश पातळीवर प्रगती कारक वाटते, काही खात्यांचे जाळे जरी त्यांचे मजबूत वाटत असले, तरी राज्यात व देशात राबवणारी व्यवस्था मात्र निश्चितच शंकास्पद आहे, यात जनतेला आता तीळ मात्र शंका राहिली नाही.

१)बॅलेट पेपरच्या निवडणुकी रद्द करून ईव्हीएम घोटाळे तयार करणे.

२) महाराष्ट्राला कर्जबाजारी करून, सत्तेच्या दबावाने तोडफोड करून शासन तिजोरीच्या पैशाचा गैरवापर करणे, इतर बाहेरील पक्ष फोडून सत्तेत घेणे.

३) कॉंग्रेसने चालवलेली शेतकरी विरोधी धोरणे सतत पुन्हा तीच ती वापरून शेतकरी आत्महत्या घडविणे.

४) उदा. पंजाब - हरियाणा येथील शेतकरी दिल्लीकडे आगेकूच करताना, शेतकरी हिताचे धोरणे राबविण्यासाठी आंदोलनाद्वारे वाटचाल करीत असताना, केंद्र सरकारने शेतकऱ्यांना दिलेली क्रूर वागणूक, शेतकऱ्याचे झालेले बेहाल, भारतातील जनतेच्या नजरेत आजही खूपत आहे. त्या आंदोलनात गेलेले शेतकऱ्यांचे जीव हा एक भाजपा सरकारला लागलेला मोठा कलंक आहे.

५) आमदार - खासदार यांना सत्तेतील पैसा वाटून गुलाम बनविणे, आणि त्यांना वाटलेल्या पैशावर इडीचा धाक दाखवून आमदार- खासदारांनाच ताब्यात ठेवणे, जैलात ,तुरुंगात पाठविण्याची धमकी देणे.

६) निवडणुकी घेण्यासाठी निवडणूक आयोगाला मनुष्य बळ वापरण्यासाठी शासनाची मदत घेऊनच , निवडणूक कार्यक्रम जाहीर करावे लागते. त्यामुळे सत्तेच्या लालचीसाठी आयोगाला राजकीय दृष्ट्या ताब्यात ठेवून निवडणुकीवर अंकुश ठेवणे असे गैरप्रकार घडत आहे.

७) कोर्टातील न्यायाधीशांना धमकावून स्वतःच्या बाजूने निकाल लावल्या जात असेल, असे गैरप्रकार जनतेच्या निश्चितच लक्षात आलेली आहे.

८) तिजोरीतील जनतेचा पैसा अधिकृतपणे राजरोसपणे वाटून निवडणुकी जिंकण्यासाठी मतदान मिळविणे.

९) शेतकऱ्यांना शेतीमालाचा हक्क न देता, अधिकार न्याय, मिळवून न देता, लाचारीत व गुलामीत ठेवून तिजोरीतील पैशावर शेतकरी - शेतमजुरांवर उपकार केल्याची भावना तयार करणे.




१०) इंग्रजांच्या काळातील माफीवीर पंतप्रधान होणे, देश विरोधी कारवाया करून तडीपार नेत्यांना या देशाचा गृहमंत्री होणे, हा निश्चितच लोकशाहीचा गैरवापर होत आहे

११) सामाजिक न्यायव्यवस्था तोडून सत्तेत जाण्यासाठी जे जे शक्य असेल ते वाटेल ते करणे. परंतु हातची सत्ता जाऊ नये यासाठी सर्व जनतेला मूर्ख बनविणे.

१२) भारतातील लोक किती अंधभक्त आहेत, हे धार्मिक प्रवृत्ती वापरून जनतेला बेवकूफ बनविले, जसे : गणपती दूध पिते . कोरोना काळात थाली व मेणबत्त्या लावून अंधश्रद्धा पसरविने.

१३) सत्तेच्या बाजूने लढणाऱ्यांना क्रांतीकारक समाज हिताची माणसे हाऊस मध्ये निवडून न येऊ देता, गुंडेबाजाना सत्ता टिकविणेसाठी सतत प्रयत्न करण्यात आलेत.

१४) पिढ्यान- पिढ्या धार्मिक वृत्तीची समाज मनावर पकड तयार करून सामाजिक व आर्थिक धोरनाचा गैरवापर करून, सतत सत्ता टिकविणे व यालाच राष्ट्रधर्म समजणे.

१५) वारकरी, कीर्तनकार, गुरुदेव सेवक यांचा धार्मिक प्रवृत्तीसाठी लालच दाखवून गैरवापर करून घेणे चालू झाले.

१६) विकासाच्या नावावर नगर विकास मंत्रालयाच्या मार्फत शहरी विकास करून, ग्रामीण भाग मातीत घालण्याचे कटूकारस्थान सतत दिवसेंदिवस वाढत राहिले. तर ही धोरणे सर्व लोकशाही विरोधी आहेत.

१७) शेतकऱ्यांना सोयाबीनचे भाव परवडत नसल्यामुळे उत्पादन खर्च निघत नाही म्हणून निवडणुकी काळात विधानसभा प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात येऊन आमचे सरकार आले तर शेतकऱ्यांना सोयाबीनला सहा हजार रुपये भाव देऊ, अशी ग्वाही दिली होती.

१८) सत्तेत आलो तर आम्ही त्वरीत कर्जमाफी करू ही सर्व आश्वासने शेतकऱ्यांना फसवणुकीची वाटत आहे.

१९) तुमच्या नैसर्गिक संकटात उपयोगी न पडता , ती आर्थिक मदत मात्र योग्य वेळी देऊ असे जरी भाजप सरकार म्हणत असेल, तरी ते निवडणूक जिंकण्याच्या उद्देशानेच पैसा वाटप करतील व पुन्हा निवडणूक जिंकतील.

२०)जन सुरक्षा विधेयकाच्या नावावर सामाजिक नेत्यांचा चळवळीतील जनतेचा, चळवळीतील कार्यकर्त्यांचा नेत्यांचा आवाज दाबून ठेवणे.

२१) डॉ .आंबेडकरांनी छोटे राज्य व्हावे अशी इच्छा व्यक्त केली असताना, भाजपा सरकारने विदर्भ प्रदेश व इतर छोटे राज्य आम्हाला मंजूर आहेत हे मान्य केले असले तरी, जनतेला बेवकूफ बनून ती राज्य योग्य वेळ आल्याशिवाय देणार नाहीत.

हीच परंपरा आता इतरही राजकीय पक्ष चालवीत आहेत. मतदारांनी योग्यवेळेची दखल न घेतल्यास त्याचे परिणाम संपूर्ण देशातील लोकांना भोगावे लागतील. ज्यां आंदोलकांनी शेतकऱ्याचे न्याय,हक्क व अधिकारासाठी उठाव केलेत, तेव्हा शेतकरी नेते जास्तीत जास्त संख्येनी हाऊस मध्ये मतदारांनी निवडून पाठविली नाही. त्यामुळे शेतकरी विरोधी कायदे, आर्थिक धोरणे बदलली नाही. त्याचे परिणाम सुध्दा पुढे जनतेलाच , मतदारांना भोगावे लागेल. ज्यांचा शेतकरी प्रश्नावर अभ्यास होता,ती मंडळी जनतेनी घरी बसविली व इतर वेगळीच मंडळी सत्तेत पाठविली, याला तर जनताच दोषी आहे. कारण सरकार हेच जनतेच्या मतावर चालते. महाराष्ट्र हा फुले, शाहू, आंबेडकर तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्री संत गाडगेबाबा, डॉ. पंजाबराव देशमुख, संत गुलाबराव महाराज, साने गुरुजी, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, माधवराव खंडेराव मोरे नाशिक, स्व. शरद जोशी यांच्या कर्मभूमीचा, व पुरोगामी विचारसरणीचा हा देश आहे.

काही राजकीय पक्षांनी पुरोगामी विचाराचा नायनाट करून, धर्माच्या नावावर चुकीचे नवरराष्ट्र तयार करण्याच्या पद्धतीला सुरवात केली. त्यावर आता जनतेलाच लगाम लावावा लागेल. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक धोरणाला मूठ माती देण्याचे काम चालू असल्याचे दिसत आहे. आता संविधानावर फक्त डॉ.आंबेडकरांचा फक्त फोटो शिल्लक राहिला, मात्र त्याची विचारधारा मातीत घालण्याचे छडयंत्र चालू झाले. मूळ संविधानाची पूर्ण चिरफाड केली. तसेच शिवाजी महाराजांचे नाव घेऊन शिवाजी महाराजांचा फोटो छापून हिंदू धर्मात, व इतर जातीच्या विरुद्ध द्वेष निर्माण करून, लोकशाही विरोधी कृती आता सरकारची समाजाला दिसत आहे. हिंदूचीच फसवणूक करून हिंदू- मुस्लिम सत्ता स्थापन केल्या जात आहे. जर या क्रांतीतून जनता पुन्हा उफाळून आली तर पुन्हा या देशात हल्ले वाढतील ."आंधळी दडते व कुत्र पीठ खाते "

लोकशाही विरोधी धोरणे वापरून सत्ता चालणार, हा मूर्खपणाचा कळस चालू ठेवला तर निश्चितच याचे परिणाम जनतेलाच भोगावे लागतील. कारण महाराष्ट्र हा संत परंपरेतील,ऋषी व कृषीचा एका सामाजिक दृष्टिकोनातून पुरोगामी विचारसरणी चा देश आहे, याचा पुनर्विचार करावा लागेल.



**धनंजय पाटील काकडे**
९८९०३६८०५८
अध्यक्ष- शेतकरी- वारकरी, कष्टकरी महासंघ, महाराष्ट्र

## मालमत्तेचे व्यवहार करताना तोतयांपासून सावधगिरी बाळगावी

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** तोतया व्यक्तींना पुढे करून बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणी करण्याचे प्रकार घडत असून, या पार्श्वभूमीवर जनसामान्यांनी मालमत्तेच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करतांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे सह जिल्हा निबंधक यांनी केले आहे.

एका तोतया व्यक्तीने स्वतःला मूळ मालक म्हणून दर्शवत बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्तनोंदणी केल्याचा गंभीर प्रकार अंधेरी येथील सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात 29 जानेवारी रोजी उघडकीस आला आहे. या प्रकरणी स्वतःला सलाउद्दीन आदम नाईक या मूळ मालकाच्या जागेवर भासवणारे मोहम्मद रफीक मोहम्मद इलियास यांच्याविरुद्ध जूहू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सह जिल्हा निबंधक कार्यालयात मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री, गहाणखत, बक्षीसपत्र, हक्कसोडपत्र, पॉवर ऑफ ॲटर्नी, करारनामे, विकसन करारनामे आदी सामान्य नागरिकांची कामे नियमित स्वरूपात मोठ्या प्रमाणात केली जातात.

भविष्यात अशा प्रकारच्या फसवणुकीद्वारे मूळ मालकांची फसवणूक होऊ नये यासाठी नागरिकांनी कोणतेही व्यवहार करतांना जागरुकता बाळगण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे सह जिल्हा निबंधक रमेश पगार यांनी केले आहे.

## यंदा डॉल्बीला फाटा; पारंपरिक वाद्यांत शिवजयंती मिरवणूक काढण्याचा निर्धार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मध्यवर्ती शिवजन्मोत्सव महामंडळाची महत्त्वपूर्ण बैठक रविवार, दिनांक १ फेब्रुवारी रोजी डाळिंब आड येथील शिवजयंती मंडळाच्या मैदानात पार पडली. मावळते अध्यक्ष सुशिल बंदपट्टे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सन २०२५-२६ या वर्षासाठी मध्यवर्ती शिवजन्मोत्सवाचे नवे पदाधिकारी निवडण्यात आले.यंदाच्या उत्सव अध्यक्षपदी जयवंत सलगर यांची तर कार्याध्यक्षपदी उत्तरा बरडे-बचुटे, कृष्णा सुरवसे यांची निवड करण्यात आली.



**नूतन पदाधिकारी असे**

अध्यक्ष जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बरडे बचुटे, कृष्णा सुरवसे, उपाध्यक्ष चारुशीला जगदाळे, संजीवनी मुळे,अनिरुद्ध पाटील, नामदेव पवार, रमेश जाधव, किरण भंडारी, सेक्रेटरी पुरुषोत्तम भोगडे, सह सेक्रेटरी अंबादास सपकाळ, खजिनदार संदीप काशीद, सहखजिनदार सुजित चौगुले, मिरवणूक प्रमुख विजय पुकाळे, प्रसिद्धीप्रमुख दीपक शेळके, कृष्णकांत चव्हाण, कुस्ती प्रमुख विठ्ठल कलाकते बापू जाधव, कार्यालय प्रमुख तुषार गायकवाड,कृष्णा भुरळे, देविदास घुले, सोमनाथ बनसोडे.

या बैठकीत यंदाच्या शिवजयंती मिरवणुकीबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजाला फाटा देत, ढोल-ताशे, लेझीम, रणशिंग, तुतारी यांसारख्या पारंपरिक वाद्यांतूनच शिवजयंती मिरवणूक काढण्याचा निर्धार एकमताने करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, संस्कृती व विचार नव्या पिढीपर्यंत सुसंस्कृत पद्धतीने पोहोचवण्याचा उद्देश या निर्णयामागे असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या निर्णयाला उपस्थित सर्व शिवजयंती मंडळे व शिवप्रेमींनी उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवला. यंदाची शिवजयंती सांस्कृतिक, शिस्तबद्ध व पारंपरिक पद्धतीने साजरी करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

या बैठकीस शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्ट अध्यक्ष पद्माकर काळे, पुरुषोत्तम बरडे, राजन जाधव, चंद्रकांत वानकर, दिलीप कोल्हे, सुनील रसाळे, भाऊ रोडगे, विजय पुकाळे,लहू गायकवाड नगरसेवक शिवजी वाघमोडे, श्रीकांत डांगे, ज्ञानेश्वर सपाटे श्रीकांत घाडगे महादेव गवळी, मतीन बागवान, प्रकाश ननवरे, शिवा कामठी, प्रताप चव्हाण, सुरज बडगर, गणेश डोंगरे, अशोक कलशेट्टी, गजानन चक्रपाणी, आबा सावंत, सोनू खरात, जवाहर जाजू, पंकज काटकर, एडवोकेट रामचंद्र कदम, जीवन यादव ब्रह्मदेव पवार, यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. मध्यवर्ती महामंडळामध्ये काम केलेले पदाधिकारी शिवाजी वाघमोडे, महादेव गवळी यांची यांची कन्या, विनोद भोसले, मंडळाचे ट्रस्टी अनिकेत पिसे, नगरसेवक झाल्या प्रित्यात मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

## रोजगार,पायाभूत सुविधा,सामाजिक न्यायाचा समतोल साधणारा अर्थसंकल्प : हेमंत पाटील

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प (२०२६-२७) हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीचे आणि सबळ, आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेचे प्रभावी प्रतिबिंब असल्याचे मत भारत अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी व्यक्त केले. हा अर्थसंकल्प विकास, समावेशकता आणि सुशासन यांचा समतोल साधणारा ठरेल, विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अर्थसंकल्पातून पायाभूत सुविधा, रोजगारनिर्मिती, कृषी, शिक्षण आणि डिजिटल अर्थव्यवस्था यांवर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे. रस्ते, रेल्वे, लॉजिस्टिक्स आणि शहरी पायाभूत सुविधांसाठी करण्यात आलेल्या मोठ्या तरतुदींमुळे देशाच्या आर्थिक वाढीला गती मिळेल. ग्रामीण भागातील कनेक्टिव्हिटी वाढविणे, सिंचन आणि कृषी मूल्यसाखळी मजबूत करण्यासाठी जाहीर केलेल्या उपाययोजना शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी आशादायी आहे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

कृषि उत्पादन वाढविण्यासाठी ५०० जलसाठे व हृअमृत सरोवरह्व प्रकल्पाचे समन्वित विकास, मत्स्यपालन आणि पशुधन क्षेत्रातील सुधारणा यांना वित्तीय पाठबळ देण्याची घोषणा केली आहे. देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांसाठी ही घोषणा दिलासादायक ठरेल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी कर्जसुलभता,



स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि नवोन्मेषासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या घोषणा तरुणांना रोजगार व उद्योजकतेकडे आकर्षित करणाऱ्या आहेत.

शिक्षण, कौशल्य विकास आणि डिजिटल साक्षरतेवरील गुंतवणूक भविष्यातील भारत घडविण्यास मोलाची ठरणार आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ओबीसी, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांना अर्थसंकल्पीय पाठबळ स्वागतार्ह असल्याचे पाटील म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि परिणामकारक प्रशासनाची दिशा अधिक भक्कम होत आहे. केंद्रीय अर्थसंकल्प (२०२६-२७) हा केवळ आर्थिक दस्तऐवज नसून, रोजगार, पायाभूत सुविधा,सामाजिक न्यायाचा समतोल साधणारा आणि विकसित भारताच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

## पंढपूरात शहर पोलीसांची १०५ वाहनांवर कारवाई: ५७ हजारांचा दंड वसूल

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर पंढरपूर शहर पोलीसांनी रविवारदि.०१ फेब्रुवारी रोजी विशेष मोहीम राबवली. यामध्ये १०५ वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करुन ५७ हजार ९०० रुपये दंड वसुल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे यांनी दिली.

पंढरपूर शहरात श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी दररोज मोठ्या प्रमाणात भाविक येतात तसेच शहरात मोठी बाजारपेठ , दवाखाने, शासकीय कार्यालयात कामकाजासाठी दररोज विविध भागातील हजारो नागरिक दुचाकी, चार चाकी अथवा इतर वाहनांने येतात.

मात्र गेल्या काही दिवसांपासून ट्रिपल प्रवास, फॅन्सी नंबर, विना परवाना, विना नंबर, कर्कश आवाजाचे सायलन्सर बसविणे तसेच विरुध्द दिशेन गाडी चालविणे यामुळे सतत वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. याला आळा घालण्यासाठी शहर पोलीसांनी विशेष मोहिम राबवून १०५ वाहनचालकांवर कारवाई केली. सदर कारवाई सहा पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, शहर पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, वाहतुक शाखेचे ठाणे अंमलदार, होमगार्ड यांनी केली.

### वात्रटिका

**आपले ठेवा झाकून....**

विलग झालेल्या काहीचा
विलनीकरणाचा प्रयास आहे...
पण तसे होऊच नये म्हणून
काहीचा वेगळा कयास आहे...
प्रयास नि कयास वादात
अनेकांची उगाच उडी आहे...
दुसऱ्याची सोय बघताना
आपलीच विस्कळीत घडी आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# टाकळी जिल्हा परिषद गटात शिवसेनेचा झंझावात प्रचार दौरा

## कोर्टी येथील शंभू महादेवाला नारळ फोडून प्रचाराला सुरुवात



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक प्रचाराला सुरुवात झाली असून पंढरपूर तालुक्यातील टाकळी जिल्हा परिषद गटातील कोर्टी येथील शंभू महादेव नारळ फोडून शिवसेनेने प्रचाराचा धडा सुरू केला आहे. दरम्यान प्रचाराचा शुभारंभ झाल्यानंतर कोर्टी येथे काढण्यात आलेल्या प्रचार फेरीला मतदारांचा आणि लाडक्या बहिणींचा शिवसेनेच्या उमेदवाराला उस्फुर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक सुरू असून कमी वेळेत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक ठिकाणी आघाडी आणि युतीच्या उमेदवारांकडून होम टू होम प्रचारावर भर दिला जात आहे. पंढरपूर तालुक्यातील आठ जिल्हा परिषद गट आणि सोळा पंचायत समिती गणात शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी, आरपीआय आठवले गट, स्वाभिमानी शेतकरी संघटना, संभाजी ब्रिगेड या पक्षासह समविचारी नेतेमंडळींनी एकत्र येत आघाडी स्थापन करण्यात आली असून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार अभिजीत पाटील, शिवसेनेचे सोलापूर संपर्कप्रमुख महेश साठे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, टाकळीचे माजी सरपंच संजय साठे, आरपीआय आठवले गटाचे नेते आप्पासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली कोर्टी जिल्हा परिषद गटात शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या उमेदवारांचा प्रचाराचा झंझावात सुरू झाला आहे.

# 'संघर्ष योद्धा हरपला' अजितदादा पवार यांना पी.बी. ग्रुपकडून भावपूर्ण श्रद्धांजली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे लाडके माजी उपमुख्यमंत्री, संघर्ष योद्धा कै. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर येथील प्रबुद्ध भारत चौक, थोरला राजवाडा, मिलिंद नगर, बुधवार पेठ येथे पी.बी. ग्रुपच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद (दादा) चंदनशिवे व माजी नगरसेवक गणेश पुजारी यांनी कै. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली व स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद दादा चंदनशिवे, पक्षाचे सचिव चंद्रकांत सोनवणे, सचिव इरफान शेख, नगरसेवक गणेश पुजारी, श्रीमंत जाधव, गौतम नागटिळक, ॲड. विशाल मस्के, शेरा मोकाशी, किरण साळवे व पवनकुमार मंडेपोल्लु यांनी आपल्या भावना व्यक्त करत लाडक्या नेत्याला आदरांजली अर्पण केली.

कार्यक्रमास भारत बाबरे, सुखदेव इंगळे, गौतम महाराज चंदनशिवे, बाळासाहेब तांबे, कन्हैया लालबिगी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर उपाध्यक्ष अजमल शेख, मोहन बनसोडे, बापू शिंदे, धम्मपाल मैंदर्गिकर, अमित माने, भीमा इंगळे, आदित्य चंदनशिवे, अक्षय मस्के, संदीप कापुरे, रवी काकडे, रंगा वाघमारे, प्रतीक चंदनशिवे, प्रा. अविनाश शिंदे, रवी सकट, प्रथमेश सुरवसे, सुमित चंदनशिवे, गौतम शिंदे, सागर देडे, कैलास वाघमारे, सुरज जगताप, अक्षय कुचेकर, मनोज थोरात, यशवंत आडाकूल, सुबन्ना स्वाके, भीमा मस्के, जयराज सांगे तसेच पी.बी. ग्रुपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या श्रद्धांजली सभेमुळे संपूर्ण परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले होते.

# महिला वर्ग केंद्रस्थानी ठेवून अर्थ संकल्प मांडला - रोहन सुरवसे पाटील



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** आत्मनिर्भर भारत योजनेला गती व महिलावर्ग केंद्रस्थानी ठेवून अर्थसंकल्प मांडला असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार गट) युवक नेते रोहन सुरवसे पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

पुढे बोलताना रोहन सुरवसे म्हणाले की, ग्रामीण भागातील मुलींना कौशल्य असूनही शहरात निवासाची सोय नसल्याने उच्च शिक्षण घेण्यापासून वंचित रहावे लागत होते, परंतु आता प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतिगृह बांधणार असल्याने, त्यांच्या विकासाला वाव मिळेल. हा अर्थसंकल्प 'युवाशक्तीचे बजेट' म्हणून सादर करण्यात आला असून, गरीब, शेतकरी, युवा आणि मध्यमवर्गीयांना केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी सांगितले.

# ६ फेब्रुवारी पासून टेंभूर्णी फेस्टिव्हलचे आयोजन



**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील सर्वात मोठा सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून ओळख असलेल्या टेंभुर्णीतील बहुजन प्रतिष्ठान च्या वतीने दरवर्षीप्रमाणे या वर्षीही "टेंभूर्णी फेस्टिव्हल २०२६" चे ६ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी या काळात या भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती फेस्टिवलचे संयोजक व अध्यक्ष रघुनाथ वाघमारे व संतोष वाघमारे यांनी दिली. फेस्टिव्हलचे यंदाचे यशस्वी सलग २२ वे वर्ष असून हा महोत्सव टेंभुर्णी शहरासह संपूर्ण माढा तालुक्यातील नागरिकांचे मुख्य आकर्षण बनला असून आठ दिवसामध्ये जवळपास दीड लाख लहान थोर नागरिक भेट देतात यामध्ये कला,ज्ञान, विद्यान, मनोरंजन, कृषी व औद्योगिक प्रदर्शन, सामाजिक प्रबोधनपर, अंधश्रधानिर्मुलन यावर आधारित प्रदर्शन, कार्यक्रमामध्ये- दि ७. गायन स्पर्धा लहान गट, दि ८. डान्स स्पर्धा, दि ९. गायन स्पर्धा मोठ गट, दि .१० भजन स्पर्धा, दि. ११ तबला वादन स्पर्धा, दि. १२.फॅन्सी ड्रेस स्पर्धा लहान गट या स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत.तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आर्केष्ट्रा लावण्या, भारुड, लेझीम, वाघ्या मुरुळी या कार्यक्रमाबरोबरच एकेरी डान्स स्पर्धा ग्रुप डान्स स्पर्धा यांचे देखील आयोजन करण्यात आले आहे. तर नागरिकांच्या व बाळगोपाळांच्या मनोरंजनासाठी आकाश पाळणा, दोन मारुती कारचा मौत का कुवा, बैंक इस पन्नालाल, सत्यम्बी चांदतारा, टोराटोरा, मिनी ट्रेन पैरकला, जादूचे प्रयोग इत्यादी साधने उभारण्यात येणार आहेत. हॉटेल्स व महिलांच्या खरेदीसाठी ज्वेलरी, संसार उपयोगी वस्तू लहान मुलांची खेळणी यांची १०० भव्य दुकाने उभारले जाणार आहेत. तसेच गृह उपयोगी वस्तू व कृषी उपयोगी अवजाराचे प्रदर्शनही या मध्ये आहे. तर खवय्यासाठी चायनिज, पावभाजी,

मंच्युरियन, शोरमा, पिज्झा,

बिऱ्याणी यासह विविध खाद्यपदार्थाचे ५० स्टॉल लावण्यात येणार आहेत. कुडुर्वाडी रोडवरील भव्य मैदानात हा महोत्सव पार पडणार असून नियोजनाला प्रारंभ झाला आहे.बहुजन प्रतिष्ठान मार्फत या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने आजवर मूणत माजी न्या. बी. जी. कोळसे-पाटील, डॉ. बाबा आढाव, ॲड. भास्करराव आव्हाड, साहित्यिक डॉ. आनंद यादव यासारखे विचारवंत भेट देऊन गेलेले आहेत. गेल्या तीन वर्षापासून सिने क्षेत्रातील कलावंत उद्घाटनासाठी हजेरी लावत आहेत. प्रतिष्ठान मार्फत दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी संस्थापक रघुनाथ वाघमारे. अध्यक्ष संतोष वाघमारे, विकास सुर्वे,गणेश पोळ, गणेश चौगुले,सोमनाथ नलवडे,हरिशचंद्र गाडेकर,धनंजय भोसले, झुंबर जाधव, योगेश दाखले, चंद्रकांत कुटे, पोपट सरडे,शरपुद्दीन मुलाणी,समाधान बोराटे, अशपाक तांबोळी, विनोद आखाडे,दशरथ कसबे, रोहिदास वाघमारे, सुनील जगताप, समाधान लोंढे,बाळू मोरे इ. कार्यकर्ते परिश्रम आहेत. अधिक माहितीसाठी संतोष वाघमारे (९८२०१०८२१०) यांचेशी संपर्क साधन्याचे अहवान करण्यात आले आहे.

# प्रा. चंद्रकांत ढोले यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न

## शिक्षण प्रवाहातील आनंदयात्री या गौरव ग्रंथाचे झाले प्रकाशन



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** येथील श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ, अनगर संचलित कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत ढोले सर यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित समारंभ मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात संपन्न झाला. ते मुख्याध्यापक म्हणून 33 वर्ष सात महिने 21 दिवस एवढी प्रदीर्घ सेवा देऊन सेवानिवृत्त होत आहेत.

सर्वप्रथम स्वर्गीय लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन झाले . मान्यवरांचा सन्मान करण्यात आला यावेळी शिक्षण प्रवाहातील आनंदयात्री या ढोले सरांच्या जीवनावरील गौरव ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले व यावेळी त्यांना मानपत्र देऊन त्यांचा सपत्नीक सेवापुर्तीचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षण संचालक गंगाधर म्हमाने उपस्थित होते. आपल्या भाषणात ते म्हणाले की, 'मी या शाळेला अनेक वेळा भेट दिली आहे. गुणवत्ता, शिस्त व संस्कार यामुळे ही शाळा ओळखली जाते. ग्रामीण भागातील सर्वात मोठी शाळा म्हणून या विद्यालयाचा लौकिक आहे. ढोले सरांनी राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही शाळा उत्तम व आदर्श पद्धतीने चालवली असून अनेक सुसंस्कारित पिढ्या घडवण्याचे महत्त्वाचे कार्य या शाळेने केले आहे ग्रामीण भागात उत्तम शिक्षणाची सोय या शाळेने केली आहे.'

कार्यक्रमात माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत सर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'ढोले सरांनी अतिशय निष्ठेने व समर्पित भावनेने काम केले आहे.

ते एक उत्तम प्रशासक असून त्यांच्या या गुणवत्तेचा संस्थेने पुढील काळातही उपयोग करून घ्यावा,' असे मत त्यांनी मांडले.

यावेळी मारुती फडके उपायुक्त परीक्षा परिषद पुणे यांनीही ढोले सरांना सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष व माजी आमदार राजन पाटील होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, 'अवघ्या 27 विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही शाळा आज 2315 विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे.

शाळेच्या व संस्थेच्या विस्तारात प्राचार्य ढोले सरांचा वाटा मोठा आहे. त्यांच्या अंगी असलेली संस्थेप्रती निष्ठा व कामावरील श्रद्धा लक्षात घेऊन त्यांची संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात येत आहे,ह्व अशी घोषणा त्यांनी केली. यावेळी नियुक्तीचे अधिकृत पत्र ढोले सरांना प्रदान करण्यात आले.

प्राचार्य चंद्रकांत ढोले सर यांच्या सेवाकाळातील शैक्षणिक गुणवत्ता, शिस्तप्रियता, प्रशासन कौशल्य व विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन याचा सर्व वक्त्यांनी गौरव केला. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग यांच्या वतीने ढोले सरांचा सत्कार करण्यात आला.

हा सेवापूर्ती समारंभ केवळ निवृत्तीचा नसून एका यशस्वी शैक्षणिक प्रवासाच्या गौरवाचा सोहळा ठरला, अशी भावना उपस्थितांमध्ये व्यक्त होत होती.

यावेळी लोकनेते साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक ओमप्रकाश जोगदे,माजी प्राचार्य रंगसिद्ध दसाडे माजी प्राचार्य भिकाजी कुलकर्णी प्राचार्य सुधीर गायकवाड प्राचार्य बशीर बागवान प्राचार्य संजय करंडे माजी मुख्याध्यापक विश्वजीत लटके मुख्याध्यापक रामचंद्र पाटील मुख्याध्यापक संजय डोंगरे मुख्याध्यापक विश्वजीत देशमुख मुख्याध्यापक शिवाजी तळेकर उप मुख्याध्यापक महादेव चोपडे पर्यवेक्षक माधव खरात आदी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्यवान दाढे यांनी सूत्रसंचालन केले तर माधव खरात यांनी आभार मानले.


## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

अकील महंमद हुंडेकरी
वय - ५० वर्षे. धंदा- मजुरी
रा. मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार अकील महंमद हुंडेकरी यांचा जन्म दि.१/६/१९७६ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार अकील महंमद हुंडेकरी यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९७६ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंदनसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१८/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.
ता. ०३/०२/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

शौकत हसन बागवान
वय - ६५ वर्षे. धंदा- मजुरी
रा. पुणे } **अर्जदार**

**विरूद्ध**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार शौकत हसन बागवान यांचा जन्म दि. १/६/१९६० रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार शौकत हसन बागवान यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९६० चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१८/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.३/२/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०चे कलम २२ - (२) नियम ७ व ७ अ वाचावे )

**बदल अहवाल क्रमांक:- ७९१/२०२५**

ज्याअर्थी, नवी पेठ व्यापारी कमिटी पंढरपूर ता.पंढरपूर जि. सोलापूर न्यास नोंदणी क्रमांक ई- ४८ (सोलापूर) या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता विश्वस्त श्री. विश्वेश्वर दिगंबर भिंगे रा.४३६६,दाळे गल्ली, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर यांनी वर नमूद बदल अहवालामध्ये किरकोळ अर्ज क्रमांक १७७२/२०२५ हा अर्ज सादर करुन बदल अर्ज क्रमांक ७९१/२०२५ हा तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) बदलाकरिता सादर केलेला आहे व तो मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर, यांनी दिनांक ०१.०१.२०२६ रोजी तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) स्विकारण्यात आलेला आहे.त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर बदलअहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीसप्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूरयांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजुन सदरबदल अहवाल क्रमांक ७९१/२०२५ मधील कि. अ.क्र. १७७२/२०२५ मध्ये दिनांक ०१.०१.२०२६ रोजीतात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) स्विकारण्यात आलेला बदल अहवाल हा अंतिम आदेश म्हणून कायम राहील याची नोंद घ्यावी.आज दि.०३/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त यांच्या शिक्यानिशी दिली.

(शिक्का) **अधिक्षक सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


# हरित महाराष्ट्रसाठी ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा - मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण- ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा. स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल.

मराठावाड् यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.


यावेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे. या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून, लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे.

झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित तपासणी करण्यात येणार आहे.

मनरेगा, कॅम्पा, कृषी विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांद्वारे तीन ते पाच वर्षांची निगा सुनिश्चित करण्यात आली आहे. तथापी वृक्ष जगण्यासाठी हा कालावधी १० वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमातून भूजल पुनर्भरण, मातीची सुपीकता, जैवविविधता वाढीसोबतच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार तथा मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास (२) विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच गोविंदराज, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मृद व जलसंधारण सचिव गणेश पाटील, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (सामाजिक वनीकरण) विवेक खांडेकर, महाराष्ट्र रिमोट सेन्सिग अप्लिकेशन सेंटरचे (एमआरएसएसी) चे संचालक कोलते आदी उपस्थित होते.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे राष्ट्रवादीतून पुढे आलेले एक नेते
२) एक हिंदी सिनेनिर्माते-** चोप्रा ३) डाळ अथवा भात शिजवण्यासाठी याचा वापर करतात ४) आडातून पाणी खेचण्याचे चक्राकार साधन
५) सलमान खानचा थोरला भाऊ
६) भारतीय क्रिकेट टीममधील ऐंशीच्या दशकातील अष्टपैलू खेळाडू ११) दात
१३) मोठी पेटी
१६) पाठवणे, **** करणे
२०) सूट, मोकळीक
२२) महादेवाचे एक नाव २४) महाराष्ट्रातील एक जिल्हा
२७) शरीर, काया
२८) कार उलट लिहा
२९) चांगला रूचकर स्वयंपाक बनविणारी स्त्री
३०) कपडे धुण्याचा एक साबण
३२) समुद्र ३३) बंदूक (इंग्रजीत)
३४) चरण ३६) हळू, मंद गतीने
३७) शुभकार्यासाठी उभारलेला छत
३९) सातत्याने, नेहमी
४१) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत)
४२) ईश्वर (हिंदीत),४६) श्रीविष्णू पत्नी
४७) गंध, परिमळ

**आडवे शब्द :** १) हेराफेरी चित्रपटातील एक प्रमुख अभिनेता
५) अभिनेता असलेला अमिताभ बच्चन यांच्या मुलाचे नाव ७) संशय ८) एक म्हण-*** तो वजीर ९) एक म्हण-बळी तो कान ** १०) जरचा साथीदार १२) घोडेसवारी, फेरफटका १४) ख्रिश्चन बांधवाचा पवित्र धर्मग्रंथ १५) एखाद्या कामासाठी स्वत:जवळचे पैसे खर्च करणे-***मोड करणे १७) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक १८) उणीव, टंचाई १९) धान्याचा ढीग २१) स्पेशल, विशेष २३) उमर (मराठीत) २५) महिलांचा नाकात घालण्याचा एक दागिना २६) वतनाचा मालक २९) शेतातील कामाचा हंगाम ३०) खलनायक (इंग्रजीत) ३१) तक्रार, फिर्याद (हिंदीत) ३१) फर्निचरसाठी या झाडाचे लाकूड वापरतात
३३) चूक, चुकीचे (हिंदीत) ३४) ब्रेड (मराठीत)
३५) मान (हिंदीत) ३६) दुधावरील मलई ३७) आठवड्यातील एक दिवस-***वार, एक उपग्रह ३८) वाळूचे मैदान ३९) प्रॅक्टीस (मराठीत) ४०) कडूच्या विरूध्दार्थी शब्द ४१) माघारी देणे, माघारी करणे-*** देणे ४३) श्रवणेंद्रिय
४५) कालच्या अगोदरचा दिवस ४८) लिंबू पाण्याचे पेय
४९) भारताचे माजी कृषिमंत्री-*** पवार
५०) महिना

## सुडोकु - 167

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | 3 | | | 4 | 1 | |
| 1 | 8 | 5 | | 2 | | 7 | | 3 |
| | | | 5 | | | 9 | 2 | 8 |
| | 9 | 6 | 8 | | 2 | | 5 | 7 |
| 2 | 1 | | | 4 | | 3 | | |
| | 5 | | | | 6 | | 8 | 4 |
| 5 | | | | | 4 | 6 | | |
| | | | 6 | 1 | 3 | 5 | 4 | |
| | | 9 | | | 7 | | | |

# शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांनी साजरी होणार मामासाहेब जगदाळे जयंती

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** भूषण कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, याची माहिती संस्थेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, जॉईंट सेक्रेटरी ए. पी. देबडवार, खजिनदार तथा सांस्कृतिक विभागप्रमुख बापू शितोळे आदी मान्यवर उपस्थित होते.



कर्मवीर मामासाहेबांनी बौद्धिक विकासासोबतच शारीरिक विकासालाही नेहमीच प्राधान्य दिले. हा विचार पुढे घेऊन जाताना त्यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय कबड्डी, जलतरण, बुद्धिबळ, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल तसेच खो-खो (मुली) अशा विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

जयंती महोत्सवाची सुरुवात दि. १ फेब्रुवारी रोजी माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख यांच्या विद्यार्थी व पालकांसाठी आयोजित प्रेरणादायी व्याख्यानाने झाली. दि. २ फेब्रुवारी रोजी संस्थेच्या जिजाऊ, सावित्री व रमाई महिला विकास समितीतर्फे डॉ. धनश्री लेले यांचे महिलांसाठी प्रेरक व्याख्यान होणार आहे. दि. ३ फेब्रुवारी रोजी संस्थेतील गुणवंत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार जॉईंट कमिशनर, इन्कम टॅक्स (मुंबई) महेश लोंढे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता कर्मवीर मामासाहेबांनी सुरू केलेल्या परंपरेनुसार व कै. वायुपुत्र नारायणराव जगदाळे यांनी सातत्याने चालवलेल्या कर्मवीर ज्योतीचे व धावपटूंचे आगमन संस्था परिसरात होणार आहे. दुपारी ४ वाजता समाजदिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, त्यात प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष व संस्थेचे माजी विद्यार्थी प्रा. मिलिंद जोशी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ख्यातनाम साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे असणार आहेत. याच वेळी कर्मबीर मामासाहेबांनी सुरू केलेल्या परंपरेनुसार बीरमाता व वीरपत्नींचा सन्मान करण्यात येणार आहे.

दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कर्मबीर डॉ. मामासाहेब जगदाळे समाज परिवर्तन गौरव पुरस्कार पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांना प्रा. डॉ. सोमनाथ रोडे (लातूर) यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे जयंती सोहळ्यातील सांस्कृतिक कार्यक्रम व कर्मवीर जनजागरण फेरी रद्द करण्यात आली असून, उर्वरित कार्यक्रम अत्यंत साध्या पद्धतीने साजरे करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.

# रस्ते, वीज, पाणी प्रश्न सोडवण्यासाठी भाजपच सक्षम - आ. सचिन कल्याणशेट्टी

**बोरेगाव (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पक्ष विकासाचे ठोस व्हिजन घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरला असून, रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत गरजा सोडवण्यासाठी जनतेने भाजपला विजयी करावे, असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथे भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वैशाली पाटील होत्या.



आ. कल्याणशेट्टी म्हणाले की, शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून सन्मान निधी योजनेअंतर्गत आर्थिक मदत दिली जात आहे. महिलांसाठी उज्ज्वला गॅस योजना राबविण्यात येत असून, स्टार्टअप व कौशल्य विकास योजनांमुळे तरुणांसाठी रोजगार व उद्योगाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. युवकांचे भविष्य सक्षम, सुरक्षित व आत्मनिर्भर बनवण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, गेल्या काही वर्षात मतदारसंघातील अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी 'एकरुख'योजनेच्या माध्यमातून उजनीचे पाणी आणण्यात आले असून, यामुळे परिसरात हरितक्रांतीस चालना मिळणार आहे.यावेळी भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांनी जिल्हा परिषद मतदारसंघात केलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली. या प्रसंगी जिल्हा परिषद उमेदवार श्रुती भोरगुडे, धोत्री पंचायत समिती उमेदवार शिल्पा बिराजदार, कुंभारी पंचायत समिती उमेदवार सूरज पाटील, धोत्रीचे उपसरपंच सुधीर चौगुले यांच्यासह कुंभारी जिल्हा परिषद मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ विधिज्ञ पुरस्काराने ॲड. विश्वनाथ आळंगे सन्मानित

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथील ज्येष्ठ दिवाणी व फौजदारी वकील ॲड. विश्वनाथ (व्ही. एस.) आळंगे यांना बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा तर्फे देण्यात येणारा 'ज्येष्ठ विधिज्ञ' हा सर्वोच्च पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारताचे माजी सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्या हस्ते मुंबईजवळील तळोजा येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



भारतातील पहिल्या ॲडव्होकेट अकॅडमीच्या उद्घाटनप्रसंगी तसेच सिनियर ॲडव्होकेट पुरस्कार वितरण समारंभात हा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्या. सी. चंद्रशेखर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती न्या. रेवती मोहिते-डेरे, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाचे अध्यक्ष ॲड. हर्षद निंबाळकर, माजी अध्यक्ष व सदस्य ॲड. मिलिंद थोबडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पहिल्या ॲडव्होकेट अकॅडमीचे उद्घाटन करण्यात आले.

ॲड. आळंगे हे १९७७ पासून सोलापूर येथे दिवाणी व फौजदारी क्षेत्रात यशस्वी वकिली करीत असून, आळंगेज लॉ क्लासेसच्या माध्यमातून त्यांनी हजारो वकील, न्यायाधीश, सरकारी वकील व लॉ ऑफिसर्स घडवले आहेत. त्यांनी सोलापूर येथील दयानंद विधी महाविद्यालय, बालचंद कॉलेज (एम.एस.डब्ल्यू. विभाग) तसेच भारती विद्यापीठ एलएल.एम. सेंटर येथे कायदेविषयक व्याख्याते म्हणूनही कार्य केले आहे.

तसेच ते श्री सिद्धेश्वर देवस्थानचे विश्वस्त असून, देवस्थानात लीगल सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. वकिली क्षेत्रातील त्यांचा दीर्घ, बहुआयामी आणि उल्लेखनीय अनुभव लक्षात घेऊन त्यांना हा ज्येष्ठ विधिज्ञ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या समारंभास सोलापूरमधील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एल. एन. मारडकर, सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे सदस्य ॲड. आर. एस. पाटील, ॲड. आर. एस. आळंगे, ॲड. अशोक जालादी, ॲड. किरण कनाळे, ॲड.अजित आळंगे, ॲड. शुभम माने, ॲड. सागर स्वामी, ॲड. प्रकाश सोनार यांच्यासह अनेक वकिलांनी उपस्थिती लावली होती.

# आमदार असोत किंवा नसोत माढ्याचे पालकमंत्री रणजितसिंह शिंदे- पालकमंत्री गोरे

## जिल्हा परिषद व माढा पंचायत समितीवर भाजपचा भगवा झेंडा फडकणार

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा मतदारसंघाच्या विद्यमान लोकप्रतिनिधींनी आमदार फंड सोडून एक रूपयाचाही निधी मतदारसंघाचृया विकासासाठी आणला नाही याउलट रणजितसिंह शिंदे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर कोट्यवधी रुपयांचा निधी आणला. विविध प्रश्न व समस्या आणि योजना मार्गी लावण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. भविष्यातही त्यांच्या पाठीशी आणि मतदारसंघाच्या विकासासाठी निधी देण्यासाठी शासन व मी खंबीरपणे उभा आहे त्यामुळे आमदार असोत किंवा नसोत माढ्याचे पालकमंत्री रणजितसिंह शिंदेच असल्याचे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले आहे.



**'उपळाई बुद्रुक येथे अभ्यासिकेसाठी 50 लाख देणार'**

उपळाई बुद्रुक हे शासकीय अधिकारी व नोकरदारांचे गाव आहे.येथे विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे अनेक विद्यार्थी आहेत त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या वेळी विद्यमान आमदारांनी अभ्यासिका सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. कसलाही निधी न देता ते आश्वासन हवेतच विरले आहे परंतु या निवडणूकीची आचारसंहिता संपली की, या ठिकाणी अभ्यासिकेसाठी पालकमंत्री या नात्याने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मी 50 लाखांचा निधी मंजूर करणार आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वाचे असणारे ग्रामविकास खाते माझ्याकडेच असल्यामुळे माढा मतदारसंघासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

"जनतेला खोटी व फसवी आश्वासने देण्यात विद्यमान आमदार पटाईत" - खोटी व फसवी आश्वासने देऊन विधानसभा निवडणुकीत आमदारकी पदरात पडून घेणाऱ्या विद्यमान लोकप्रतिनिधींनी अद्यापही शेतकऱ्यांच्या उसाला 3500 दर दिला नाही याबाबत शेतकऱ्यांनी त्यांना जाब विचारला पाहिजे.शासनाकडून पंढरपूरच्या विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला 350 रुपयांचे कर्ज विद्यमान लोकप्रतिनिधींनी घेतले होते त्याचा विनयोग नेमका कसा केला आहे.त्या संदर्भातील सखोल चौकशीची परिक्रमा सुरू झाली असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी माजी जि.प.सदस्य भालचंद्र मोरे, रोहिणी मोरे, शंभूराजे मोरे, सरपंच मुन्नाराजे मोरे, कृष्णा शिंदे, सरपंच संदीप पाटील, मदन झाडबुके, हनुमंत गिड्डे, योगेश पाटील, दिपक पाटील, प्रकाश कुलकर्णी, वैभव मोरे, अस्लम काझी, आप्पाराव वाघमोडे, विजय शेटे, व्यंकटराव पाटील, अजितसिंह देशमुख, प्रदिप चौगुले, दत्तात्रय जाधव, नानासाहेब शेंडे, मनोज गायकवाड, सतीश शेंडे, दादा नागटिळक, सज्जन जाधव, मदन मुंगळे, शिरीष पाटील, भागवत चौगुले, लक्ष्मण जाधव, अमोल चवरे, बाबा वाघमोडे, गणपत साठे, संतोष लोंढे, शाहूराव वाकडे, दिगंबर इंगळे, सोमेश्वर शेंडे, अजिनाथ बेडगे, डॉ.प्रदीप पाटील, अतुल माळी, विश्वनाथ शिंदे, सुरेश यादव, उमेश कदम, शहाजी भांगे यांच्यासह ग्रामस्थ, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ते उपळाई बुद्रुक ता.माढा येथे जिल्हा परिषद गटाचे भाजपच्या उमेदवार माधुरी तानाजी मोरे, उपळाई बुद्रुक पंचायत समिती गणाचे उमेदवार नितीन मदन झाडबुके व भुताष्टे पंचायत समिती गणाच्या भाजप पुरस्कृत उमेदवार स्वातीताई हनुमंत गिड्डे यांच्या प्रचारार्थ सभेत 31 जानेवारी रोजी बोलत होते. सभेच्या सुरुवातीला राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रास्ताविक जिल्हा दूध संघाचे संचालक शंभूराजे मोरे यांनी केले.

पुढे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, सीना-माढा उपसासिंचन योजनेचे पाणी सुरू व्हावे, या योजनेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना निधी मिळावा, माढा तालुक्यातून शक्तिपीठ महामार्ग जावा,मोडनिंब एमआयडीसी कार्यान्वित व्हावी यासाठी विद्यमान आमदारांनी कधीही शासन दरबारी पाठपुरावा केला नाही याउलट आमदार नसतानाही रणजितसिंह शिंदे यांनी सातत्याने माझ्याकडे व शासनाकडे या पाठपुरावा करून हे महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावले. विद्यमान लोकप्रतिनिधी हे न केलेल्या विकासकामांचे श्रेय घेऊन जनतेची दिशाभूल करण्यात पटाईत आहेत. माजी आमदार बबनदादांनी माढा मतदारसंघाचा विविध विकासकामांच्या माध्यमातून जिल्ह्यात व राज्यात नावलौकिक केला होता परंतु विद्यमान लोकप्रतिनिधींनी मतदारसंघातील जनतेचा विश्वासघात व भ्रमनिरास केला आहे. अकलूजकरांचीही अवस्था काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासारखी झाली आहे. भाजप सरकारने लाडकी बहिण योजना, शेतकरी सन्मान निधी, कृषी पंपाची संपूर्ण वीज बिल माफी केली याची परतफेड म्हणून मतदारांनी भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून सोलापूर जिल्हा परिषद व माढा तालुका पंचायत समितीवर भाजपचा भगवा झेंडा फडकवावा असे आवाहन केले.

यावेळी जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे म्हणाले की,आम्ही विकासाच्या मुद्द्यावर निवडणुकीला सामोरे जात आहोत परंतु विरोधक मात्र विकासावर एक शब्दही न बोलता फक्त माझ्यावर टीका करणे हाच विकास समजत आहेत.सीना-माढा उपसासिंचन योजनेतून पाणी सुरू व्हावे यासाठी मी व पालकमंत्र्यांनी प्रयत्न केले.सीना-माढा उपसासिंचन योजनेत नव्याने समाविष्ट गावांना पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी 300 कोटीं व उपळाई बुद्रुक येथे अभ्यासिकेसाठी निधीची मागणी केली.या भागातील विविध रस्त्यांची कामे करण्यासाठी निधीची मागणी केली.सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टी व सीना नदीच्या महापुराच्या वेळी विद्यमान लोकप्रतिनिधींनी नुसती बघ्याची भूमिका घेऊन खोट्या प्रसिद्धीसाठी शासकीय मदतीसमोर फोटोसेशन व रिल्स् तयार करून जनतेला वाऱ्यावर सोडून दिले होते. विधानसभा निवडणुकीत झालेली चूक पुसण्याची हीच संधी आहे तेंव्हा भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

# ऊस व तोडणी वाहतूकी बिलासाठी 79 कोटी अदा- बबनराव शिंदे

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब या कारखान्याचे 11 ते 20 जानेवारी या दहा दिवसाचे प्रति टन रू.3025/-प्रमाणे पहिला हप्ता ऊस बील सभासद, ऊस पुरवठादार यांचे बँक खात्यात जमा करणेत आले आहे. तसेच दि.16 ते 31 डिसेंबर या पंधरवड्याचे ऊस तोडणी वाहतूक बील जमा करणेत आले आहे अशी माहिती कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा.आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

अधिक माहीती देताना मा. आ.बबनराव शिंदे म्हणाले, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब या कारखान्याचा सन 2025-26 चा गाळप हंगाम जोमाने सुरू आहे. या हंगामात युनिट नं.1 कडे सरासरी प्रतिदिन 14700 मे.टन व युनिट नं.2 कडे सरासरी 5000 मे.टन पेक्षा जादा गाळप होत आहे. आजअखेर युनिट नं.1 कडे 1314768 मे.टन व युनिट नं.2 कडे 450425 मे.टन असे एकूण 1765193 मे.टन गाळप झालेले आहे. 11 ते 20 जानेवारी या दहा दिवसाचे प्रति टन रू.3025/-प्रमाणे पहिला हप्ता ऊस बील सभासद व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणेत आले. या ऊस बिलासाठी 53 कोटी 74 ला अदा केलेले आहेत. 20 जानेवारी अखेर ऊस बिलासाठी एकूण 476 कोटी 19 लाख अदा करणेत आलेले आहेत. तसेच कारखान्याकडे ऊस तोडणी वाहतुक करणा-या ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदारांचे दि.16 ते 31 डिसेंबर या पंधरवड्याचे ऊस तोडणी वाहतूक बिल कंत्राटदारांचे बँक खात्यात जमा करणेत आले आहे.

त्यापोटी कारखान्याने 25 कोटी 31 लाख बँकेत जमा केले आहे. दि.31 डिसेंबर अखेर ऊस तोडणी वाहतूक बिल अदा करणेत आले असून आजअखेर ऊस तोडणी वाहतूक बिलासाठी 104.75 कोटी अदा करणेत आलेले आहेत. युनिट नं.1 व 2 कडील सन 2025-26 गाळप हंगामातील गाळपाचे उदिद्षपुर्तीसाठी सभासद व ऊस पुरवठादारांनी त्यांचा सर्व ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्यास पुरवठा करून गाळप हंगाम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मा.आ.शिंदे यांनी केले.

# उपजिल्हाधिकारी देशमुख यांच्याकडून आढावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपजिल्हाधिकारी महसूल तथा ग्रामपंचायत निवडणूक प्रमुख संतोषकुमार देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक(दूरदृश्य प्रणाली द्वारे) पार पडली. या बैठकीत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी तसेच नोडल अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान देशमुख यांनी निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी स्पष्ट करून त्याचे महत्व अधोरेखित केले. निवडणूक पारदर्शक, सुरळीत व कायदेशीर चौकटीत पार पडावी यासाठी प्रत्येकाने आपापल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात, असे त्यांनी सांगितले.

देशमुख यांनी नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. मतदान केंद्र व्यवस्थापन, साहित्य वितरण, प्रशिक्षण, सुरक्षा व्यवस्था, तसेच मतदार जागृती यासंबंधीच्या जबाबदाऱ्या त्यांनी तपासून पाहिल्या. प्रत्येक नोडल अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात वेळेत व नियोजनबद्ध पद्धतीने काम पूर्ण करावे, अशी सूचना त्यांनी दिली.

सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रत्येक मतदार केंद्रावर करण्यात आलेल्या सुविधाची पाहणी करावी, मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना बैठकीत देण्यात आली.

निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे मतदान केंद्राचे वेबकास्टिंग करण्यात यावे. तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांना आयोगाच्या निर्देशानुसार प्रशिक्षण देणे, साहित्य व मनुष्यबळ मतदानाच्या दिवशी वेळेवर पोहोचेल यासाठी योग्य नियोजन करणे यावर भर देण्यात आला.

**सुधारित निवडणूक कार्यक्रम**

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हा परिषदेच्या 68 गट व पंचायत समितीच्या 136 गणासाठी निवडणूक प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. दिनांक 7 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 वाजता ते सायंकाळी 5.30 वाजता या कालावधीत मतदान होईल तर 9 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजले पासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

**मीडिया पासेस**

मतदानाच्या दिवशी तसेच मतमोजणीच्या दिवशी स्थानिक स्तरावरील प्रिंट मीडिया तसेच इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रतिनिधींना पास देण्याची व्यवस्था सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावरून राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत. जिल्हास्तरावरील इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रतिनिधींसाठी पास देण्याबाबत जिल्हा स्तरावरून स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही सूचित करण्यात आले आहे.

**लोकशाही प्रक्रियेचे महत्व अधोरेखित**

देशमुख यांनी सर्व अधिकाऱ्यांना निवडणूक ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया असल्याचे सांगून जबाबदारीने व पारदर्शकतेने काम करण्याचे आवाहन केले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने कोणालाही कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर तात्काळ निवडणूक शाखेची संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# शिवजयंती निमित्त रंगभरण स्पर्धेचे आयोजन

## डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचा उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधुन जिल्हास्तरीय रंगभरण स्पधेर्चे आयोजन करण्यात आल्याची माहीती संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद आगलावे व शहराध्यक्ष अनिल गायकवाड यांनी दिली. ही स्पर्धा चार गटात पार पडणार आहे.गट पहिला-इयत्ता पहिली व दुसरी, गट दुसरा- इयत्ता तिसरी व चौथी, गट तिसरा- इयत्ता पाचवी व सहावी, गट चौथा- इयत्ता सातवी व आठवी. स्पर्धा शाळा स्तरावर पार पडणार आहे.जागतिक दर्जाचे चित्रकार नितीन खिलारे हे स्पर्धेचे परीक्षक म्हणुन काम पाहणार आहेत. प्रत्येक गटातुन प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांना गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेची नाव नोंदणी साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेत दिनांक ५ फ्रेब्रुवारी पर्यंत करावी. या स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी सहभागी व्हावे असे आवाहन संतोष माशाळे,विशाल काळे,समीर शेख, दिपक डांगे,धन्यकुमार स्वामी, प्रकाश बाळगे, प्रदिप सातपुते, वजीर शेख, सिद्धेश्वर पवार, भाउसाहेब मोरे, शाम कदम, हणमंत भोसले, नारायण पवार, संतोष शितोळे, नितीन भांगे, संतोष रजपुत,अतुल नारकर, निलेश पवार, किरण गाटे, यांनी केले आहे.



# नानासाहेब राणे यांना राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नानासाहेब जयराम राणे हे मोरजाई विद्यालय, मोरोची, ता. माळशिरस या ठिकाणी वरिष्ठ लिपिक म्हणून काम पाहत आहेत. त्यांना चेंबूर, मुंबई येथे महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ आयोजित ५३ वे राज्यस्तरीय अधिवेशन व चर्चासत्र व पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून आ.सत्यजित तांबे, आ.कपिल पाटील, आ. ज्ञानेश्वर म्हात्रे तसेच निरंजन डावखरे, अध्यक्ष अनिल माने कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर, शिवाजी खांडेकर हे उपस्थित होते. वरील उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते नानासाहेब राणे यांना राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नानासाहेब राणे यांनी शैक्षणिक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सेवक पदावर सेवाव्रत काम पाहत आहेत. या सेवेसोबत सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक कार्यात्त देखील मोलाचे योगदान आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ यांनी नानासाहेब राणे यांच्या कायार्ची दखल घेऊन राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार प्रधान केला. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल माळशिरस तालुक्यातून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कला - क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांकडून त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# सत्तेशिवाय विकास शक्य नाही; सांगोल्याच्या प्रगतीसाठी महायुतीची सत्ता गरजेची- शहाजीबापू पाटील

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला तालुक्याचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर जिल्हा परिषद व पंचायत समितीत महायुतीची सत्ता असणे अत्यावश्यक आहे. येत्या चार वर्षात तालुक्यातील सर्वच सिंचन प्रकल्पाचे काम मार्गी लावून सर्वच शेती सिंचनाखाली आणण्याचा निर्धार केला आहे. सत्तेबरोबर राहिल्यासच विकासकामांना गती मिळते. जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठीच आपल्याला सत्तेत सहभागी व्हायचे आहे. सत्तेशिवाय विकास शक्य नाही, त्यामुळे सांगोल्याच्या प्रगतीसाठी महायुतीची सत्ता गरजेची आहे, असे स्पष्ट मत माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.

महायुतीचे भारतीय जनता पक्षाचे चोपडी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत, चोपडी पंचायत समिती गणाचे उमेदवार अजय सरगर, राजुरी पंचायत समिती गणाचे उमेदवार डॉ.सदाशिव दबडे यांच्या प्रचारार्थ लोणविरे, हणमंतगाव, निजामपूर, राजुरी येथे प्रचार सभा घेण्यात आली.



यावेळी बोलताना माजी आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, तालुक्याच्या विकासासाठी माझी स्पष्ट दूरदृष्टी असून माझी स्वप्ने वेगळी आहेत. सांगोला तालुक्यातील एकही गाव शेतीच्या व पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहणार नाही, यासाठी माझे प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. 1995 आणि 2019 मध्ये आमदार झाल्यानंतर तालुक्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली. जनतेचे हे उपकार मी कधीही विसरणार नाही. नगरपालिकेत आपली सत्ता आली असून आता जिल्हा परिषद व पंचायत समितीतही महायुतीची सत्ता खेचून आणायची आहे. सांगोला तालुक्याच्या विकासासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन,ह्व असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत म्हणाले की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून चोपडी जिल्हा परिषद गटाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध आहे. तळागाळातील लोकांना सोबत घेऊन सर्वांगीण विकास हाच अजेंडा घेऊन आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत.

जिल्हा परिषद स्तरावरून गटात राबवता येणाऱ्या विविध विकास योजनांची सविस्तर माहिती दिली. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती व मजबुतीकरण, शुद्ध पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था, जलजीवन मिशनअंतर्गत नळजोडणी, वीजपुरवठ्यातील अडथळे दूर करणे, आरोग्य उपकेंद्रे बळकट करणे, शाळांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, तसेच स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापनावर भर देण्यात येणार असल्याचे महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

यावेळी उद्योगपती बाळासाहेब एरंडे, प्रशांत वलेकर, लोणविरे गावचे माजी सरपंच सुनील पाटील, डी. एस.सावंत सर, हणमंतगाव येथील विकास सेवा सोसायटी चेअरमन संतोष खांडेकर, नाथा कोळेकर, माजी सरपंच भीमराव खांडेकर, दत्ता बंडगर, सुभाष खांडेकर, निजामपूर येथील चेअरमन मधुकर लवटे, मधुकर कदम, माजी सरपंच मोहन कोळेकर, देवाप्पा लवटे, उपसरपंच सोपान कदम, सतीश हिवरे, भाजपचे तालुका चिटणीस संतोष काळे, राजुरी येथील सरपंच दादासाहेब व्हळगळ, माजी सरपंच रामभाऊ दबडे, प्रकाश दबडे, माजी चेअरमन आनंदा बंडगर, सुखदेव खुळे, दगडू आप्पा खुळे, ग्रामपंचायत सदस्य जगन्नाथ घोंगडे, विकास सेवा सोसायटी चेअरमन पांडुरंग दबडे, व्हा.चेअरमन तुकाराम सुरवसे, बाळासाहेब बिसले, दिलीप बंडगर, ग्रामपंचायत सदस्य तानाजी चौंडे, माजी ग्रामपंचायत सदस्य तानाजी बंडगर, रावसाहेब कुटे, अंकुश कुटे, माजी उपसरपंच आत्माराम काटे, ग्रामपंचायत सदस्य सत्यवान काटे, उपसरपंच महेश काटे, आप्पासाहेब व्हळगळ, ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र माने, साहेबराव दबडे, संतोष दबडे, सूर्यकांत खुळे, संतोष येजगर, मनोज व्हरगर, भारत काटे, प्रकाश बिसले, सुखलाल बंडगर, गजानन काळे, श्रीमंत कुटे, नितीन बंडगर, शिवाजी चौडे, दगडू काशिद, दिलीप बिसले, दीपक सुतार, दिलीप दबडे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.